

# त्रैभाषिक कविता संग्रह

(मराठी / हिंदी / उर्दू)

मॉडेल इंग्लिश एज्युकेश सोसायटीचे

## शारदा महाविद्यालय, परभणी

# त्रैभाषिक कविता संग्रह

(मराठी/हिंदी/उर्दू)

**त्रैभासिक कविता संग्रह**

**प्रेरणास्थान : स्व.हेमराजजी जैन**

**श्री. अनिल हेमराजजी जैन**

सचिव, मॉडेल इंग्लिश एज्युकेशन सोसायटी, परभणी

मार्गदर्शक तथा प्रकाशक

**प्राचार्य डॉ.वामनराव जाधव**

शारदा महाविद्यालय, परभणी

संपादक

**प्रा.एस.एफ. खडके**

शारदा महाविद्यालय, परभणी

विद्यार्थी संपादक

**पवन चंद्रकांत स्वामी**

विद्यार्थी संपादकीय मंडळ

**प्रतिक्षा काळे, मुकूंदा गरूड, प्रिती तांबे**

संपादक मंडळ

**प्रा.डॉ.उज्वला जगताप, प्रा.डॉ.वैशाली देशपांडे**

**प्रा.डॉ.हनुमंत शेवाळे, प्रा.डॉ.काझी कल्लिमोद्दीन**

**प्रा.डॉ.सय्यद नुरूल अमीन,**

समन्वयक

**प्रा.डॉ.प्रशांत मेने, प्रा.डॉ.श्यामसुंदर वाघमारे, प्रा.डॉ.नवनाथ सिंगापुरे**

**प्रथम अवृत्ती : ३० ऑगस्ट २०१८**

**सर्व हक्क – संपादक मंडळ**

**मुद्रक : अनिल गरड, महेश ऑफसेट, परभणी**

**स्वागत मुल्य : ३० रुपये**

# संपादकीय

'त्रैभाषिक कवितासंग्रह' आपल्या हाती देतांना आम्हाला मनस्वी खूप आनंद होत आहे. या काव्यसंग्रहात मराठी, हिंदी व उर्दु या तीन भाषेतील कवितांचा समावेश केला आहे. खरे तर त्रैभाषिक कवी संमेलन घेण्यामागची संकल्पना ही आमच्या विद्यार्थ्यांची आहे. अशा प्रकारचे उपक्रम महाविद्यालयात सातत्याने झाले पाहिजेत ही भूमिका आमचे प्रेरणास्थान स्व.हेमराजजी जैन (भाईजी) यांची होती. आठ दिवसापूर्वी पवन स्वामी, मुकुंदा गरूड, प्रतिक्षा काळे, मुसेब, इमाम, गायत्री, प्रिती यांच्यासह अनेक विद्यार्थी माझ्याकडे व डॉ.रमेश भालेराव यांच्याकडे आले आणि त्यांनी अग्रह धरला 'सर आपल्या महाविद्यालयात हा कार्यक्रम आयोजित करू' विद्यार्थ्यांच्या मनातील तीव्रता लक्षात घेऊन मी आदरणीय प्राचार्य डॉ. जाधव सरांशी चर्चा केली. तेंव्हा सरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत ही चांगली संकल्पना आहे. कार्यक्रमाचे आयोजन चांगल्या पद्धतीने करा असे सांगितल्याने पुन्हा नवा उत्साह आला व मग या सर्व कविता एकत्रितपणे टाईप करून एक कवितासंग्रह करण्याचे ठरले पवन स्वामी या विद्यार्थ्याने या कविता स्वतः टाईप केल्या व त्यातून हा कवितासंग्रह व ई-कवितासंग्रह आज प्रकाशनासाठी सिद्ध झाला आहे.

हा कवितासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण झाला असून विद्यार्थ्यांनी मानवी मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या कविता लिहून या पुस्तकाचे मोल आणखीनच वाढवले आहे. कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेले विचार पाहता उद्याचा जगाचा भविष्यकाळ उत्तम राहणार याची खात्री पटते. युवकांच्या डोक्यातून असेच उदात्त विचार प्रसृत होऊन जगामध्ये मंगलमय वतावरण तयार होईल याचीही खात्री वाटते.

असो विद्यार्थ्यांच्या या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी संपादकीय मंडळातील प्रा.डॉ.सौ.उज्वला जगताप, प्रा.डॉ.सौ.वैशाली देशपांडे, प्रा.डॅ.हनुमंत शेवाळे, प्रा.डॉ.काझी कल्लीमोद्दीन, प्रा.डॉ.नुरून अमीन व डॉ.नवनाथ सिंगापुरे यांनीही या अंकासाठी परिश्रम घेतले. आमच्या संस्थेचे सचिव अनिल जैन, प्राचार्य डॉ. वामनराव जाधव, श्री. निखील जैन, उपप्राचार्य डॉ.श्यामसुंदर वाघमारे, प्रा.डॉ. प्रशांत मेने यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. व हा ग्रंथ कमी वेळात सिद्ध करण्याची जबाबदारी महेश ऑफसेटचे श्री अनिल गरड यांनी घेतली म्हणून हा त्रैभाषिक कविता संग्रह अत्यंत कमी वेळेत आपल्यापर्यंत सादर करू शकलो. हा उपक्रम करत असतांना महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनीही या उपक्रमाला पाठबळ दिले अशा सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो व सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून असेच उपक्रम विद्यार्थी यापुढेही निश्चितपणे पार पाडतील अशी अशा व्यक्त करतो.

संपादक

**एस.एफ. खडके**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | जात | प्रियंका कोंडिबा कांबळे | ६ |
| २ | गाय | प्रियंका कोंडिबा कांबळे | ८ |
| ३ | अजून जगायचंय | मूकूंदा गरूड | ९ |
| ४ | तुला असं का वाटतंय | मूकूंदा गरूड | १० |
| ५ | हरकत काय ? | मूकूंदा गरूड | ११ |
| ६ | आई | सुगंधे अर्चना वाघोजी | १२ |
| ७ | तोफांचे चौघडे वाजले | सुगंधे अर्चना वाघोजी | १३ |
| ८ | हिरवे शेत | सुगंधे अर्चना वाघोजी | १४ |
| ९ | मैत्री | प्रतिक्षा गजानन काळे | १५ |
| १० | प्रतिक्षा | प्रतिक्षा गजानन काळे | १६ |
| ११ | फुलपाखरू | प्रतिक्षा गजानन काळे | १७ |
| १२ | तू पावसात भीज | आदर्श कवळीकर | १८ |
| १३ | षटकोन | प्रिती तांबे व प्रतिक्षा काळे | १९ |
| १४ | आजचं सोशल कलयुग | प्रिती रमेशराव तांबे | २० |
| १५ | मन | निकीता मस्के | २१ |
| १६ | जीवनात कोण असावेत | निकीता मस्के | २२ |
| १७ | आई | निकीता मस्के | २३ |
| १८ | राखीपोर्णिमा | शेख सत्तार | २४ |
| १९ | आई मला सोडुन का जात आहे. | सपना गोविंद चिंचाणे | २५ |
| २० | ''स्वातंत्र्य गैरवापर करण्यासाठी नाही'' | सपना गोविंद चिंचाणे | २६ |
| २१ | प्रार्थना | गुरव शितल शिवाजी | २७ |
| २२ | निवडणूक | गुरव शितल शिवाजी | २८ |
| २३ | बारीश | काळे शुभांगी | ३० |
| २४ | तिरंगा फडक रहा है | काळे शूभांगी | ३१ |
| २५ | मेरे गुरु | काळे शुभांगी | ३२ |
| २६ | जीना आ गया | मूकूंदा गरूड | ३३ |
| २७ | कुछ पाना है | मूकूंदा गरूड | ३४ |
| २८ | अगर प्यार ना होता | मूकूंदा गरूड | ३५ |
| २९ | उर्दू विभाग | | ३६–४७ |

# मराठी विभाग

# जात

धान्याला लागलेला किडा जसा
हळुहळु पोते संपवतो
उंदीर जसा डोंगर पोखरतो
तसंच चित्र देशाच झालंय
देशाला जातीच्या वाळव्यानी खाल्लय ।। धृ।।

प्रत्येक जातीची संघटना
कोणाची भिमसेना, लालसेना तर
कुणाची शिवसेना
जय भीम, रामराम, जय श्री कश्ष्ण,
जय शिवराय नमस्कारालाही नाव दिलय
देशाला जातीच्या वाळव्यानी खाल्लय ।। १ ।।

वाळव्याची संख्या वाढत आहे
देशाची किडही वाढत आहे
लोकशाहीला हादरा बरत आहे
प्राण गमवून हे स्वातंत्र्य मिळवलंय
हेच प्रत्येकजण विसरलय
देशाला जातीच्या वाळव्यानी खाल्लंय ।।२।।

माणसाने देवालाही जातीत विभागलंय
शिव, अल्ला, येशु ना दिलंय
येशु चर्चमध्ये, अल्ला मस्जिद तर
शिव शिवालय
राहण्याचं ठिकाणही ठरवलंय
जातीनं देवालाही वाटुल घेतलंय
देशाला जातीच्या वाळव्यानी खाल्लंय ।।३।।

**— प्रियंका कोंडिबा कांबळे**
**बी.ए.तृतीय वर्ष**

# गाय

होते वयात तोवर लेकरासारखं जपलंय
म्हातारपणाला मला
कसायाच्या दावणीला बांधलस ।। धृ।।

हिरवं हिरवं गवत मला आवडायचं
मला तु हातानं चारायचं
ह्या वयात मला
का असं दु:ख दिलंस
का कसायाच्या दावणीला बांधलंस ।। १।।

अर्धपोटी ठेवुन वासराला
दुध सारं पिलंस
शेणानं सारवलस घर
मंगलमय केलस
येतं डोळ्यात पाणी
आठवतात ते दिवस
तु मला कसायाच्या दावणीला बांधलंस ।।२।।

दिलं सगळं तरी हाव, तुझी
सरली नाही.
पैशापोटी दुधाची किमयाही कळली नाही
मानेवरून फिरवणाऱ्या हाताने सुरा फिरवलास
का मला कसायाच्या दावणीला बांधलंस ।।३।।

देऊन झाले महान
पण अश्रुनेही जाईना तहान
शेवटच्या श्वासालाही वासु
नाही दाखवलंस
का मला कसायाच्या दावणीला
बांधलंस ।।४।।

का बांधलंस दावणीला कसायाच्या
कधी याचं उत्तर शोध
किती केले अत्याचार कारण
होते मी अबोध
ऐश्वर्य तुझ्या चरणी लोळावं
इश्वर इच्छा पुर्ण करो
जे जे तु मागितलंस
जरी मला कसायाच्या दावणीला
बांधलंस ।।५।।

**— प्रियंका कोंडिबा कांबळे**
**बी.ए.तृतीय वर्ष**

# अजून जगायचंय

खूप जगलो इतरांसाठी,
आपले नसलेल्या आपल्यांसाठी,
कूठेच अस्तित्व नसलेल्या त्या
मानूसकिच्या प्रेमासाठी,
ईतरांकडून मला बरंच काही शिकायचंय,
मला अजून जगायचंय
दूरूण गूलाबाच्या फूलाप्रमाणे
भासणाऱ्या चेहऱ्यापूढे,
ते काटेही बाळगूण आहेत.
हे विसरलो होतो, नकळत मी त्यांच्या रचलेल्या
डावात अडकलो होतो,
डाव कितीही मोठा असला तरी,
मी त्यातून निघू शकतो हे
त्यांना दाखवायचंय, मला अजून जगायचंय
महाभारतातील कौरवांच्या चक्रव्यूहाप्रमाणे
डाव होता त्यांचा, अभिमन्यू आपलाच आहे असा
आवाजही होता त्यांचा, पण.
अजून एक अभिमन्यू मला नाही बनायचंय,
हो मला अजून जगायचंय.
सगळेच आपले आहेत असे,
आजपर्यंत सांगता आलो,
आकाशातील चांदण्याप्रमाणे स्वत:ला
ईतरांशी बांधता आलो,
आता फक्त स्वत:शीच
नातं ठेवायचंय, हो मला अजून जगायचंय.

**— मूकूंदा गरूड**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# तुला असं का वाटतंय

तुला असं का वाटतंय,
की मी तुझ्यासाठी,
कविता केली नसेल ?
कदाचित,
जे माझ्या मनात आहे,
तेच मी त्यात लिहल असेलकृ?

मी आहेच वेडा, तरीही
विचार कर थोडा,
मी कधीतरी तुला माझ्या,
स्वप्नात पाहिलं असेल,
जे बोलत नाही मी समोर,
ते तू माझ्या स्वप्नात ऐकल असेल ?
आणि तरीही तुला वाटतं,
मी तुझ्यासाठी कविता केली नसेल ?

तू नेहमी मनतेस मला,
तू कोणत्या विचारात असतोस ?
काय मिळालय तुला की,
नेहमी हसताना दिसतोस ?
मी तुझाच विचार करतो,
असा विचार तुझ्या मनात
का येत नसेल ?
आणि,
तुला वाटतंय मी तुझ्यासाठी
कविता केली नसेल ?

माझ्या कवितेची प्रेरणा आहेस तू,
माझ्या ऱ्हदयरूपी कवितेचा श्वास
आहेस तू,
कदाचित,
हे ही तुला माहित नसेल ?
आणि
तुला वाटतं मी तुझ्यासाठी
कविता केली नसेल ???

**मुकूंदा गरुड**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# हरकत काय ?

कूणाच्या सूखासाठी आपल्याला दू:ख
मिळाले तर काय हरकत आहे
कूणाचे जूळत असेल ऱ्हदय,
आपले तूटले तर ऱ्हदय, काय हरकत आहे?

हातातून निसटनाऱ्या रेतिप्रमाणे,
आयूष्य रोजच पूढे सरकत आहे,
असेही आपले जगणे निरर्थकच् मग,
इतरांसाठी काही क्षण दिले तर,
काय हरकत आहेकृ?

सूर्य कधीच कोणाला काही मागत नाही,
तरीही वर्षानूवर्ष आकाशात
तसाच तळपत आहे,
नाहीच होऊ शकलो सूर्य
तर काय झाले,
एखाद्या अंधाऱ्या खोलीत दिवा
होण्यास काय हरकत आहे?

दगड होऊन इतरांच्या वाटेतला
अडथळा होण्यापेक्षा,
टाकीचे घाव सोसून छोटासा देव
होण्यास काय हरकत आहे?

आणि जेवढं जगलं आयूष्य इतरांसाठी,
त्यातच आयूष्याची खरी बरकत आहे,
मग विचार करून बघा,
खरंच काय हरकत आहे?

**— मूकूंदा गरूड**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# आई

आई गं आई गं
आई गं आई गं
तुझीया आठवण लई मनात येते.
तुझ्या आठवणीने जिव व्याकुळ होतो
तुझ्या प्रेमाचा कधी अंत नाही
लई तुझी आठवण येते गं आई
आई गंकृ आई गं
तु गं माझ्यासाठी शेतात राबते
काट्यातुनी धडपडत चिखलातून जाते
माझा कोटी प्रणाम तुझ्यासाठी असु दे
लई तुझी आठवण मनात खई माते
आई गं आई गं
किती गं झटते तुझ्या पिलांसाठी
देवाचा असु दे आशीर्वाद तुझ्या पाठी
आई गं तुझे दु:ख कोण जाणी
तुझ्या काळजाचे होई पाणी पाणी
आई गं आई गं
आई गं आई गं

— **सुगंधे अर्चना वाघोजी**
**बी.ए.तृतीय वर्ष**

# तोफांचे चौघडे वाजले

सर्व नेते होऊन गेले
त्या सर्वांनी कार्य केले
ते आपल्या देशासाठी लढले
तोफांचे चौघडे वाजले.

कोणी काळे पाणी प्याली
तर कोणी काळी ज्वारी खाल्ली.
हत्तीच्या पायाखाली चिरडुन मेली
तोफांचे चौघडे वाजले.

आंबेडकर हे होऊन गेले
त्यांनी देशाचे संविधान लिहिले
ते घटनेचे शिल्पकार झाले
तोफांचे चौघडे वाजले.

**— सुगंधे अर्चना वाघोजी**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# हिरवे शेत

हिरव्या हिरव्या शेतात
गुरे–ढोरे चरतात
त्याच शेतामधी
माय–बाप काम करतात.

पाऊस पडल्यावर
उगवते त्यातुन पिकं
पिकं आल्यावर
त्यावर जगतात लोकं
पिकं झाल्यावर
शेतात नांगरतात
त्याच शेतामधी
माय–बाप काम करतात.

कशी आहे धरतीची काया
धरणीची माया
तीस नसल्यावाचून
कूणाची असती छाया
म्हणुन तीच्यासाठी लोक मरतात
त्याच शेतामधी
माय–बाप काम करतात.

**– सुगंधे अर्चना वाघोजी**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# मैत्री

खडके सरांनी नाव ठेवलेल्या
पंचकोनाचा षटकोन कधी झाला
कळलंच नाही,
आपल्या या षटकोनाचा शेवट
कधी होणे शक्य नाही,
सहा जातीच्या सहा आम्ही
विचार मात्र आमचे एकच मनी ।।धश।।

नाण्यालाही दोन बाजू असतात
तसे आमच्या षटकोनालाही सहा कोन आहेत,
प्रत्येक कोन वेगळा असला
तरी सुख—दुःखात मात्र एकच आहेकृ ।।१ ।।

सगळयात गोड गायत्री, प्रिती, श्रश्ंगाली
आंबट—गोड आहेत आम्ही
प्रतिक्षा, आफसाना, दामीनी ।।१ ।।

**— प्रतिक्षा गजानन काळे**
**बी.ए. तश्तिय वर्ष**

# प्रतिक्षा

वर्षा ऋतु आला गेला
नक्षत्र निघाले पण पाऊस काही येईना
किती प्रतिखा करावी लागती रे
या शेतकरी राजाला ।।धृ।।

तुझ्यावरच अवलंबून आहे हे जग सारे
तुच या सश्ष्टीचा दाता, तुच कर्ता करविता ।।१।।

मला माहित आहे मानवानेच दुखविले तुला,
पण रूसवा—फुगवा सोडून
ये ना रे धपा—धपा ।।२।।

तु येताच ही सश्ष्टी फुलून बहरून जाते
तुझ्या आगमनानेच हे मन
प्रसन्न—प्रफुल्लित होते,
का अशी ही परिक्षा घेतो आहेस रे
का एवढी तुझी प्रतिक्षा करावी
लागती आहे रे ।।३।।

**— प्रतिक्षा गजानन काळे**
**बी.ए. तश्तिय वर्ष**

# फुलपाखरू

मुलगी म्हणजे असते धन,
बबांच असतं तिच्यात मन ।
ती लहान असताना खातलांच मन,
कारण ती असते शेवटी परक्यांच धन ।।१।।

दुसऱ्याच्या घरी आपले म्हणून राहायचे,
डोळयांत अश्रु असले तरी काम करायचे ।
आठवण आली तरी गप्प राहायचे,
पुन्हा उठून नव्याने कामाला लागायचे ।।२।।

एक दिवस आले बाबा तिच्या घरी,
रडली ती खुप जाऊन त्यांच्या जवळी ।
सांगते ती बाबा आठवण तुमची येऊ लागली,
बाबा म्हणतात वेडे झालीना भेट आपुली ।।३।।

मुलगी म्हणजे असते नाजुक कळी,
जणु उतरली अवकाशातून पाकळी ।
ती जन्मताच असते लाडक कोकरू,
म्हणूनच बाबा तिला म्हणतात फुलपाखरू ।।४।।

**— प्रतिक्षा गजानन काळे**
**बी.ए. तश्तिय वर्ष**

# तू पावसात भीज

तू पावसात भीज,
मला तूला पावसात भिजताना बघायचंय,
तूझ्या सोबत घालवलेल्या प्रत्येक,
क्षणाचं मला सोनं करायचंय.

तूझ्या डोळ्यातील निरागस प्रश्नांशी,
आज मला खेळायचंय,
इतक्या दिवस जे अनुभवलंय तेच,
आज मला सांगायचय.

आज माझा कंटाळा करू नकोस,
की मनामध्ये कूठलाही राग धरू नकोस,
कारण, आज आपल्याला इथेच थांबायचंय.
म्हणूनच,

तू पावसात भीज मला शेवट्च,
तूला पावसात भिजताना बघायचंय,
बघायचंय.

**— आदर्श कवळीकर**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# षटकोन

हुशार आहे दामिनी
पण म्हणतात सगळे तिला कमिनी
पण नेहमी तिच येते सगळयांच्या कामी ।।१।।
सगळयात ऍक्टिव इंटेलिजेंट आहे प्रतिक्षा
मनातलं ओळखण्याची घेत असते परिक्षा
प्रत्येक वेळेस ती इतरांना समजुन घेते
पण भुक लागली की स्वत:च नाटक करते ।।२।।
मनातून मनातलं तसेच पोटातून पोटातलं
सगळयांना मनमोकळं सांगणारी
अशी टॅलेंटेड गायत्री आणि आमच्या
विश्वासाची आहे ती खात्री ।।३।।
कॉलेजमध्ये फर्स्ट येणारी, आमच्या ग्रुपची शान असणारी
प्रत्येकाची सतत खेचणारी
अशी आहे आफसी ।।४।।
स्वत:च्या आवाजाने सगळयांना घायाळ करणारी
वक्तश्त्व स्पर्धेत नेहमीच नं. १ येणारी
कामात ब्रिलीयन्ट असणारी अशी आहे पिरी ।।५।।
सगळयांची मजाक करणारी
हसून हसून, ओरडून ओरडून
सर्वांना हैराण करणारी अशी
जबरदस्त श्रुंगाली ।।६।।
आम्हांचा हा षटकोन आहे
सर्वात भारी, तो सतत राहो भारी
हीच इच्छा ईश्वर चरणी ।।७।।

**—प्रिती तांबे व प्रतिक्षा काळे**

# आजचं सोशल कलयुग

सोशल मिडीयाचे जग आले रे
सोशल मिडीयाचे जग आलं
मोबाईल संगणकाच्या मागे
सर्व जग पळालं ।।धृ।।

चॅटिंग करतात रात्रंदिवस
बर झालं अंबानीन दिल यांना
जिओ च नेट बॅलेन्स ।।१।।

स्टेटस असं टाकतात की
जस काय हा आहे शाहरूख खान
पण हा आहे कॉलेजचा टपोरी यार
म्हणून याला भाव देत नाही कोणी फार ।।२।।

फेसबूक वर असतात याचे ढीगभर मित्र
पण गल्लीत कोणी विचारत नाही यांना काळ कुत्र ।।३।।

इंटरनेट च्या जाळ्यात अडकलेत
असे हे माणसे
जणू काय कोळ्याच्या जाळयात
पकडलेले हे समुद्रातील मासे ।।४।।

**— प्रिती रमेशराव तांबे**
**बी.ए. तृतिय वर्ष**

# मन

मन हे काय असतं,
आठवणींच घर असतं,
गोड गोष्टींच स्थान असतं,

मन हे काय असतं,
जीवाभावाचं नात असतं,
आपुलकीच स्थान असतं,

मन हे काय असतं
आयुष्याची साठवन असतं,
ऱ्हदयस्पर्शी असनाऱ्या गोष्टींच,
ते महत्वाच स्थान असतं,

मन हे काय असतं,
जीवनातील मौल्यवान,
गोष्टीच स्थान असतं,
प्रेमासाठी असलेल,
मानसाच हढवस,
जीवन असतं.

**— निकीता मस्के**
**बी.ए.**

# जीवनात कोण असावेत

न कळत साथ देतील
असे कुणीतरी असावे

पाठीवर हाथ फिरवणारे
माय बाप असावेत

तळहातातील फोडाप्रमाणे
जपणारे भाऊ असावेत

न बोलता समजून घेतील
असे मीत्र—मैत्रीण असावेत

हक्काणे रागवणारे
शिक्षक असावेत

फुलाप्रमाने वागवणारे
नातेवाईक असावेत

डोळयासमोर ध्येय गाठण्यासाठी
कुणीतरी आदरणीय स्थान असावेत.

**— निकीता मस्के**
**बी.ए.**

# आई

माझ्यासाठी हिच एक महाण
हिच एक कतश्त्ववान
जिवणातील मान आणि
आदरणीय असलेले प्रेरणास्थान

माझ्यासाठी हिच छाण
हिच एक विद्वाण
आयुष्यातील सण आणि
मनात असलेल ज्ञान

माझ्यासाठी हिच एक शिलवान
हिच एक गुणवान
प्रेमातील शाण आणि
आठवणीत असलेले एकमेव नाम

माझ्यासाठी हिच धनवान
हिच एक वरदान
आपूलकिच स्थान आणि
जिवनातील जीवदानकृ

**— निकीता मस्के**
**बी.ए.**

# राखीपोर्णिमा

राखीपोर्णीमेचा सण म्हणजे रक्षाबंधन
बहिण बांधी भावाच्या हाती राखीचे गंठण,

राखी बांधताना बहिण ओवाळी भावाला
भाऊ हा देवराया टाकी पैसे बहिणीला,

भाऊ—बहिणीचे नाते आहे अजोड
या नात्यापुढे नाही कशाचेच मोलं,

रक्षाबंधनामध्ये आहे वेगळीच शक्ती
नेहमी भांडणाऱ्या बहीण—भावाची होते युती,

जसा पोर्णीमेला चंद्र दिसे आकाशावर
तशीच बहिणीची राखी दिसे हातावर,

बहिण राखी बांधण्यासाठी येई दुरून
किती म्हणावे त्या भावाचे सद्‌गुण,

कोणी म्हणे तिला दिदी, कोणी म्हणे ताई
पण ती तर आहे राखेची नवलाई

बहिण म्हणजे भावाची दुसरी आई
आई वाणीच तिची माया कधीच कमी न होई,

मी तर मला समजतो भाग्यवान
कारण मला देवाने दिले तिन बहिणीचे वरदानकृकृ

**— शेख सत्तार**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# आई मला सोडुन का जात आहे.

लहानपणा पासून माझ्या सदैव सोबत असणारी
माझ्यावर निस्वार्थ प्रेम करणारी 'माझी आई'
आज मला सोडून जात आहे. माझं मन
तीला प्रश्न विचारत आहे.
सांग सांग आई मला सोडून का जात आहे ?
सांग गं आई मला सोडून का जात आहे.

मी जन्मल्यापासून प्रत्येक गोष्ट तुझ्याकडून शिकली.
पहिलं पाऊल टाकण्या पासून तुरू–तुरू चालण्या पर्यंत
तुझाच आधार घेऊन लहाणाची मोठी झाले, तुझ्या
कडूनच जगायला शिकले. आई मला तुझी खुप
आठवण येत आहे.
सांग सांग आई मला सोडुन का जात आहे ?

शाळेत जाताना मला तयार काण्यापासून दप्तर
अडकवे पर्यतचे सर्व कामे, तुच करत होती.
एवढेच नाही, तर माझ्यासाठी डब्बा खल्या शिवाय
घरी जात नव्हती. आता कोण भरवेल घास
कोण देईल डब्बा, मी या प्रश्नांचे उत्तर मागत आहे.
सांग सांग आई मला सोडून का जात आहे ?

आजपण जिवणाच्या शेवटच्या वाटेवर
असताना देखिल तुला माझाच
विचार येत आहे. शेवटची इच्छा
म्हणुन देखिल तु माझीच काळजी
घ्यायला सांगत आहेस, इतकी कशी प्रेमळ आहेस हे मन
विचारत आहे. सांग सांग आई मला सोडून का जात आहे ?
सांगण गं आईकृ मला सोडुन का जात आहेस ?

**सपना गोविंद चिंचाणे**
**बी.ए. प्रथम वर्ष**

# मुलींनो, "स्वातंत्र्य गैरवापर करण्यासाठी नाही"

काही मुलींना शिकायचे असते
पण त्यांना तो अधिकार भेटत नाही.
आणि ज्या मुलींना शिकवलं जात,
त्यांना शिकण्याचा अर्थच कळत नाही.
कॉलेज मध्ये शिकण्यासाठी जातात,
मुलांना कॉलवर बोलण्यासाठी नाही.
मुलींनो, तुम्हाना स्वातंत्र्य मिळाले आहे, पण त्याचा
गैरवापर करण्यासाठी नाही.

काही मुलींना लेक्चर आज झालं नाही म्हणून
त्यांना दिवसभर करमत नाही. आणि
काही मुलींना लेक्चर सोडून मुलासोबत
कॉफी शॅप मध्ये गेल्याशिवाय करमत नाही.
यांचा वागण्यामुळे ज्या मुलीला शिकायच आहे.
तिला शिकायलाचं भेटत नाही.
मुलींनो, तुम्हाला स्वातंत्र्य मिळाले आहे, पण त्याचा
गैरवापर करण्यासाठी नाही.

कॉलेजच्या वेळेत पिक्चरला जाणं
काही वेळासाठी मजा करणं आशा
काही मुलींच्या वागण्यामुळे काही मुलींच
आयुष्य उध्वस्त होत आहे हे त्या
मुलींना कसं कळत नसत.
मुलींनो, तुम्हाला स्वातंत्र्य मिळाले आहे, पण त्यांचा
गैरवापर करण्यासाठी नाही.

**सपना गोविंद चिंचाणे**
**बी.ए. प्रथम वर्ष**

# प्रार्थना

आईबाबा, तुम्ही का केलात
मुलामुलींमध्ये भेद?
मुलगी होताच तुमच्या
काळजात का पडला छेद.

माहित आहे तुम्हांस
होती मुलाची आस
माझ्या जन्मल्याने वाटले
ही ठरली आपला शाप.

माहीत आहे तुम्ही
मुलासाठी घेतलात सोस
पण, मी मुलगी म्हणून जन्मले
यात माझा काय दोष ?

मुलगा पाहिजे म्हणून
घरच्यांनी केला हट्ट
मुलगी म्हणून जन्माला आलेली मी
केले तुम्ही मला नष्ट.

केली अशी प्रार्थना
देवाकडे मी
देवा
कधीच कुणाच्या घरी मुलगी धाडू
नको
कारण एका मुला खातीर लाखो
मुलीस मारू नको।

**— गुरव शितल शिवाजी**
**बी.एस्सी द्वितीय वर्ष**

# निवडणूक

आली आली निवडणूक
पैशांचा पाऊस पडणार खुप
बायकांना साड्या दिल्या जाणार
भिक मागणाऱ्याची संख्या जास्तच होणार.

गावामध्ये कल्लोळ होणार
निवडूण निवडूण कोण येणारकृ?
निवडूण आला असा व्यक्ती
ज्याला कधीच करता आली नाही सही.

ते काय आपल्या गावाचे
भले करणारकृ?
चर कुत्रे त्यांच्या मागे फिरणार.

अडाणी मनुष्य असो कसाही
गावाचा विकास असो त्याच्या ध्यानी.

**— गुरव शितल शिवाजी**
**बी.एस्सी द्वितीय वर्ष**

# हिंदी विभाग

# बारीश

पानी की हर इक बूॅंद
अब मोती जैसी लागे रे,
आ जा बारीश आ जा
तू सबको भिगा दे ।। धृ।।

सूख रहे है खेत सारे
बिन तेरे,
अब जियेगा मानव
किसके सहारे,
यह है पहली पहेली बूझा दे,
आजा बारीश आजा
तू सबको भिगा दे ।। १ ।।

भटक रहे है देख
सारे यह प्राणी,
ढुंड रहे है पीने
के लिए पानी,
उनको अपनी ऑचल में लेले
आजा बारीश आजा
तू सबको भिगा दे ।।२।।

जो न करना था वह
हम कर बैठे है,
पेड थे धरती पर
वह तोड बैठे है,
अब तूही हमको अपना सहारा
दे,
आजा बारीश आजा
तू सबको भिगा दे ।।३।।

**— काळे शुभांगी**
**बी.ए. व्दितीय वर्ष**

# तिरंगा फडक रहा है

तिरंगा फडक रहा है,
मेरा देश चमक रहा है ।।धृ।।

आज पावन हूई है धरती,
हमें मिली हमारी क्रांती,
यह दुश्मन तडप रहा है,
मेरा देश चमक रहा है ।।१।।

मन में खूशियाँ ही न समाएँ,
जब झंडा उँचा उँचा लहराए,
यह झंडा फडक रहा है,
मेरा देश चमक रहा है ।

झंडा फडका था दिल्ली में पहली बार,
सलामी करते हैं हम इसे बार–बार,
ये आँगण खूशियों से भरा है,
मेरा देश चमक रहा है ।

**— काळे शूभांगी**
**बी.ए. व्दितीय वर्ष**

# मेरे गुरु

मंदिर मेरा है पाठ—शाला
और किताब है भगवान
आप गुरु है मेरे
मॉगती हूॅ ज्ञान का बरदान ।।धश।।

ए से झेड तक आपने ही सिखाया है
हर वह गूण देकर मूझे छात्र बनाया है
यहॉ पर मिली है मूझे नई पहचान
आप गुरु है मेरे
मॉगती हूॅ ज्ञान का बरदान ।।१।।

एक से सौ तक लिखना भी
आपने बताया
पढाई की पहली सिढी पर
आपने हाथ दिया
हमेशा करूंगी मै आपका सम्मान
आप गूरु है मेरे
मॉगती हूॅ ज्ञान का बरदान ।।२।।

इस मंदिर में मै
इतना ही माँगती हूँ
हमेशा आप गूरु मिले मूझे
मै आपकी शिष्य रहूँ
आप ही है सबसे गूरु महान
आप गूरु है मेरे
मॉगती हूॅ ज्ञान का बरदान ।।३।।

**— काळे शुभांगी**
**बी.ए. व्दितीय वर्ष**

# जीना आ गया

मैकदों मे पीने का,
अब मजा नही आता ।
खूली हवा मे पीना,
अब हमे पसंद आ गया ।।

क्या तेरे जाने पे हरदम,
गम के आंसु बहाना सनम ।
तेरे जाने के बाद ही,
अब सिवा तेरे जीने का हुनर आ गया ।।

गर्दीशे चॉद तारो की,
अब हमे सूनी कायनाते लगती है ।
गम से भरे इस बाजारो में,
अब खुशी का पता लगाना हमे आ गया ।।

शराब से परहेज करू तो क्युॅ,
अब शराबी बन के हमे जीना आ गया ।
लब्जों को कैद नही करता मै अभी पन्नो मे,
इन्ही में अब मुझे मैफील सजाना आ गया ।।

यादो पे तेरे रोता नही हुॅ मै,
अब अभी को यादगार बनाना मुझे आ गया
तू तो सोती होगी आराम से बिस्तर पर,
अब तो हमे खडे खडे ही सोना आ गया ।।

**— मूकूंदा गरूड**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# कुछ पाना है

माना के सफर सुहाना है,
साथ हमारे मौसम भी दिवाना है ।
पर हम अभी संभल रहे है,
क्योंकि अभी हमे कुछ पाना है ।।

रोज मिलते है हसीनाओं से कई,
नजरे कई मिलाती है ।
झॉंसे मे अब इनके न आना है,
क्योंकि अभी हमे कुछ पाना है ।।

राह पर चले जा रहे थे,
हर मोड पर मुडे जा रहे थे ।
अब राह को हमें मोडना है,
क्योंकि अभी हमे कुछ पाना है ।।

जिसने कहा उसकी मानते गए,
गर्दन को अपनी झूकाते गए ।
पर अब गर्दन उठाये जीना है,
क्योंकि अभी हमे कुछ पाना है ।।

अपनों के बीच रहते—रहते,
अपनों ने अपनेपन का मतलब ही बदल दिया है ।
पर साथ उनके ही ये दर्या पार जाना है,
क्योंकि अभी हमें कुछ पाना है ।।

**— मूकूंदा गरूड**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# अगर प्यार ना होता

प्यार कभी खुबसुरती का मोहताज नही होता,
प्यार ना होता तो पत्थर की इमारत
का नाम ताज नही होता ।।

सिवा प्यार के हम तो जरूर होते,
पर हमारा कोई हमराज ना होता ।
पास होकर तो हरकोई खुश है,
प्यार ना होता तो दुरी का एहसास ना होता ।।

हर दुआ रहती अधुरी,
अगर प्यार का सजदा ना होता ।
दुश्मनी करते फिरते लोग,
अगर प्यार मे मजा ना होता ।।

महफील भी रहती सुनी–सुनी,
अगर संगीत को प्यार का साज ना होता ।
लैला मजनू मर गए होते वक्त के साथ,
सिवा प्यार के उनका जिक्र ना करना आज होता ।।

फिर भी प्यार से शिकायत है सबको,
अगर प्यार मे दर्द का आगाज ना होता ।
प्यार का मारा कैसे यहाँ दिवाना कहलाता,
अगर उसे अपने प्यार नाज ना होता ।।

**— मूकूंदा गरूड**
**बी.ए. तृतीय वर्ष**

# उर्दु विभाग

# شاعر کا تعارف

## آب حنفی

پیدائش : 19 جولائی 1998

نام محمد مصعب الرحمن عبدالمنیب شیخ، تخلص آب حنفی۔ والد محترم ڈاکٹر منیب حنفی صاحب پروفیسر ہونے کے ساتھ ساتھ علاقہ مہاراشٹر (انڈیا) کے مشہور شاعر و نغمہ نگار ہیں۔ والدہ ماجدہ ہاشمی سیدہ نسرین کوثر بھی درس و تدریس سے وابستہ ہیں۔ ابتدائی تعلیم فاران اردو پرائمری اسکول پربھنی اور ثانوی تعلیم مؤید المسلمین ہائی اسکول پربھنی سے حاصل کی۔ شاعر بی۔اے۔ (سال سوم) شاردا مہاودیالیہ پربھنی میں زیر تعلیم ہیں۔ شاعر ایک اچھے نثر نگار بھی ہیں۔ ان کے انشائیے "دروازے اور کھڑکیاں" کو عالم ادب میں بڑی پذیرائی حاصل ہوئی۔ شہر کی مختلف ادبی و علمی سرگرمیوں میں دل کھول کر حصہ لیتے ہیں۔ غزل گوئی ان کا محبوب مشغلہ ہے۔ مختلف پروگراموں میں انہوں نے اپنی آواز کا جادو جگایا اور انعامات بھی حاصل کیئے۔ شہر و اطراف کی مختلف تنظیموں سے وابسطہ ہیں۔ آب کالج ہذا سے شائع ہونے والے سالنامہ کے نائب مدیر اور آفتاب حلقہ مطالعہ کے سیکریٹری کے طور پر اپنے فرائض انجام دے رہے ہیں۔

موبائیل : 9623325239

Email: smuaiburrahman@gmail.com

# قطعہ

## آب حنفی

اگر ہو سامنا مجھ سے مجھے شاداب کردینا
نگاہوں سے نگاہوں کو میری آداب کردینا

بتاؤ کب کہا تم سے ہمیشہ پیار سے دیکھو
کبھی انجان بن کر بھی ذرا بیتاب کردینا

# غزل

آبؔ حنفی

مجھے جشن منانا ہے
تجھے خوب ہنسانا ہے

جانم تیری گلیوں کا
مجھے گشت لگانا ہے

محبوب کی آمد ہے
آنکھوں کو بچھانا ہے

کچھ دیر ٹھہر جاؤ
بارش کا بہانہ ہے

وہ خوب سمجھتے ہیں
بس ہم کو ستانا ہے

# غزل

آب حنفی

جدھر دیکھیں وہ ادھر خوبصورت
یارا ہے ان کی نظر خوبصورت

نصیب ہو گئے تیری زلفوں کے سائے
تو لگنے لگی دوپہر خوبصورت

تلفظ میں لاتے ہیں میرے بگاڑ اب
بدن پر زیر و زبر خوبصورت

نظریہ جو بدلو تو معلوم ہوگا
دنیا میں ہے ہر بشر خوبصورت

شاعر ہوں میں شعر کہتا رہوں گا
جوں جوں ملے گی بحر خوبصورت

# غزل

آب حنفی

پہلے شدت سے ہو محنتیں محنتیں
پھر ملیں پھر ملیں راحتیں راحتیں

پستیوں کو تکبر ہی درکار تھا
لٹ گئی لٹ گئی رفعتیں رفعتیں

سسکیاں وہ بھی لیتی رہی رات بھر
میں بدلتا رہا کروٹیں کروٹیں

یار میرے مخالف زمانہ ہوا
اور تجھ پر لگی تہمتیں تہمتیں

میں بھی اپنا پتہ اس کو دونگا نہیں
اب بھٹکتی پھریں شہرتیں شہرتیں

# آزاد نظم

آب حنفی

میں یہ نا کہوں گا کہ ہر گھڑی
تیرے لمحوں میں سے بس اک گھڑی
یادوں کا اپنی سجا کے گھر
مجھے یاد کر مجھے یاد کر

تمناؤں کا میری شہر ہے یہ
اسے سنوارنا نہ اجاڑنا
کچھ دیر بس آ کر ٹھہر
مجھے یاد کر مجھے یاد کر

تجھے یاد ہوگی وہ گلی
تھی جہاں فضاء بھی صندلی
تو زلفیں اپنی سنوار کر
مجھے یاد کر مجھے یاد کر

یہ دعا ہے جب تک دم رہے
یوں ہی خوابوں میں ملتے ہم رہیں
رہیں تیرے عاشق ہر پہر
مجھے یاد کر مجھے یاد کر

# تعارف

چند لوگ زندگی میں بھی اور میدان ادب میں بھی ایک منفرد پہچان بنالیتے ہیں۔ ابتدا سے ہی قاری کے ذہن پر ایسے احساسات تجربات کے نقوش چھوڑ جاتے ہیں۔ ایسے ہی ایک متوسط طبقہ سے تعلق رکھنے والا نوجوان شاعر 2017 میں پربھنی کے اُفق پر ایک آفتاب کی طرح روشن ہوا۔ امام الدین امامؔ 10 فروری 1994 کو پیدا ہوئے۔ لڑکپن سے ہی شعر وادب سے لگاؤ رہا ہے۔ ڈاکٹر ذاکر حسین جونیئر کالج پربھنی سے بارہویں جماعت (آرٹس) میں نمایاں کامیابی حاصل کرنے کے بعد دو سالہ ڈپلومہ کورس ڈی۔ ٹی۔ ایڈ۔ ڈائیٹ کالج جالنہ سے اول درجہ سے کامیاب کیا۔ اور بی۔ اے۔ کے لیے شاردا مہاودیالیہ پربھنی میں داخلہ لیا۔ بی۔ اے۔ اول درجہ سے کامیاب ہو کر سوامی راما نند تیرتھ مراٹھواڑہ یونیورسٹی ناندیڑ سے بی۔ اے۔ کی ڈگری حاصل کی۔ ایم۔ اے۔ (اُردو) میں زیر تعلیم ہیں۔

امام الدین امامؔ کا نام نئی نسل کے اُبھرتے ہوئے نوجوان شعراء میں شمار ہوتا ہے۔ امامؔ کی غزلوں کا بغور مطالعہ کیا جائے تو ان کے محاسن کلام کا اندازہ کر لینا کوئی مشکل کام نہیں۔ ان کا خاص لب ولہجہ کلیہ طور پر بیان کرتا ہے کہ وہ اپنی شاعری کے واسطے سے زلف ورخسار، خوشی والم، رنج ونشاط اور زخم ومرہم میں آہنگی اور ربط وضبط کے ساتھ زندگی کی تلخیوں کو اپنے اشعار میں باندھنے کی سعی کرتے ہیں۔ امامؔ کی غزلیں ان کے انفرادی جذبات واحساسات کی عکاس ہیں۔ امامؔ مختلف ثقافتی سرگرمیوں میں پیش پیش رہتے ہیں۔ شاردا مہاودیالیہ پربھنی میں انہیں کئی انعامات واعزازات سے نوازا جا چکا ہے۔ کالج ہذا سے شائع ہونے والے سالنامہ کے مدیر اور آفتاب حلقہ مطالعہ کے صدر ہیں۔

شاعر: امام الدین امامؔ پربھنوی

# غزل

امام الدین امامؔ پربھنوی

دل میں جس کا خیال آتا ہے
دیکھنے وہ نہ حال آتا ہے

یہ بتاتا ہے ڈوبتا سورج
ہر کسی کو زوال آتا ہے

مفلسوں کی دعاؤں کے کارن
دو جہانوں کا مال آتا ہے

گذری صدیاں ہے ہجر میں ان کے
اب کہاں کب وصال آتا ہے

پھر تمنائیں جاگتی ہے امامؔ
جب نیا کوئی سال آتا ہے

# غزل

امام الدین امامؔ پربھنوی

آپ جو مہرباں ہو رہے ہیں
روز شب امتحاں ہو رہے ہیں

گھر میں برکت کے پودے اگا دے
میرے بچے جواں ہو رہے ہیں

حال میرا جو دشمن نے پوچھا
کیسے کیسے گماں ہو رہے ہیں

بعد مدت ملے ہیں تو ان سے
خواب رنگیں بیاں ہو رہے ہیں

پھر تصور میں ان سے امامؔ اب
دردِ دل کے بیاں ہو رہے ہیں

# غزل

امام الدین امامؔ پربھنوی

صبح اور شام مسکرانا ہے
پی کے ہر جام مسکرانا ہے

خوش بھی ہولیں کہ ہر مراحل پر
رب کا انعام مسکرانا ہے

ساتھ تم جو سفر میں آئے ہو
اب تو ہر گام مسکرانہ ہے

کوئی سمجھے تو سمجھے دیوانہ
اپنا تو کام مسکرانا ہے

منہ بناؤ نہ روبروئے امامؔ
حسن کا نام مسکرانا ہے

# غزل

امام الدین امامؔ پربھنوی

جو نزدیک ہے دل کے بھاتا نہیں ہے
جو راس آیا ہے وہ نبھاتا نہیں ہے

بچھڑنے کا ہے غم اسے بھی مگر کیوں
وہ محفل میں مجھ کو بلاتا نہیں ہے

چلاتا ہے گھر کو بڑی خوش دلی سے
وہی ایک بیٹا کماتا نہیں ہے

نہ توڑو کھلونے کی مانند اس کو
میرا دل ہے یاروں تماشا نہیں ہے

امامؔ اُس کی نظریں ہے غیروں پہ رہتی
نظر اُس کو میں ہی اک آتا نہیں ہے

# غزل

امام الدین امامؔ پربھنوی

جس کا یقین نہ ہو وہ کرامات کیجئے
راتوں کو دن و دن کو کبھی رات کیجئے

لب کپکپا رہے ہیں کوئی بات ہے ضرور
ہونٹوں میں جو دبی ہے وہی بات کیجئے

اک مشورہ ہے آپ کو حسن وجمال کا
صدقہ اتاریئے کبھی خیرات کیجئے

وحشت زدہ ماحول میں اے جان تمنا
تاریک نگاہوں سے سوالات کیجئے

دنیا سے بچ بچا کے چلے آؤ اکیلے امامؔ
اک بار کبھی ہم سے ملاقات کیجئے

मॉडेल इंग्लिश एज्युकेशन सोसायटीचे

# शारदा महाविद्यालय, परभणी

# त्रैभाषिक कविता संग्रह

## ।। कवी ।।


सपना चिंचाणे


पवन स्वामी


शेख इमाम


अर्चना सुगंधे


मुकूंद गरूड


प्रिती तांबे


शितल गुरव


निकिता मस्के


प्रतिक्षा काळे


शेख सत्तार


मुसेब उर रहेमान


प्रियंका कांबळे


शुभांगी काळे